**नानासाहेब य ना चव्हाण कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय चाळीसगाव साद संवाद फाउंडेशन चाळीसगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रा. डॉ. शरद बाविस्कर लिखित भुरा या आत्मचरित्राचे प्रकाशन**

**चाळीसगाव येथे डॉ. शरद बाविस्कर लिखित व लोकवांग्मय मुंबई प्रकाशित दुसऱ्या आवृत्तीचा प्रकाशन सोहळा.**

दिनांक 28 ऑक्टो 2021 रोजी नानासाहेब य.ना.चव्हाण कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय चाळीसगाव व साद फाउंडेशन आणीं दृष्टी फाऊडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रा. डॉ.शरद बाविस्कर(जवाहरलाल नेहरू विद्यापीठ नवी दिल्ली) लिखित भुरां या आत्मकथन पर पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्ती चे प्रकाशन सोहळा पार पडला. मा. एन. के ठाकरे (प्रथम कुलगुरू,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव) यांच्या हस्ते भूरां या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन ना. य. ना. चव्हाण महाविद्यालय येथे करण्यात आले या वेळी नई तालीम समितीचे अध्यक्ष डॉ सुगन बरंठ हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून मा प्रा. डॉ. शरद बाविस्कर, मा. प्राचार्य. डॉ.एस.आर.जाधव साद फाउंडेशन च्या अध्यक्ष प्रा. विजया चव्हाण, तसेच दृष्टी फाऊंडेशन च्या अध्यक्ष मा. प्रतिभा पाटील या उपस्थित होत्या

मा. ठाकरे सर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करतांना सांगितले की कृषक समाज हा विकसित होणे गरजेचे आहे तर प्रा.शरद बाविस्कर सर यांनी आपल्या मनोगतात भूरा लिहिण्या मागील कारणे व प्रेरणा काय आहेत हे सांगितले तसेच तरुणांनी दैववादी होण्या पेक्षा प्रयत्न वादी व्हावे तसेच अज्ञाना च्या नरकातून बाहेर पडण्यासाठी शिक्षण हा एकमेव पर्याय आहे असे सांगितले.कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. सुगण बरंठ यांनी वाचन व्यवस्था व युवक यावर आपले विचार मांडले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. वामन पाटील यांनी केले तसेच कार्यक्रमाची भुमिका मा. दिलीप चव्हाण यांनी मांडली तसेच सूत्रसंचलन कल्पतेश देशमुख यांनी केले व आभाप्रदर्शन वैशाली निकम मॅडम यांनी केले.कार्यक्रम यस्वीतेसाठी विजया ठाकूर, सचिन आगोणे, तकलिक सैय्यद, भूषण पाटील, प्रशांत खरटमल व आदींनी परिश्रम घेतले

साद-संवाद फाऊंडेशन, चाळीसगांव रजि.नं. एफ ११८७८ जळगांव जि.जळगांव

सचिव
साद-संवाद फाऊंडेशन
चाळीसगांव, जि.जळगांव

**नानासाहेब य.ना .चव्हाण कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय चाळीसगाव व साद संवाद फाउंडेशन चाळीसगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित. प्रा. डॉ. शरद बाविस्कर लिखित भूरा या आत्मकथनाचे प्रकाशन**





